## मेहकर येथील दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

(पिठासीन अधिकारी अ.अ. शेख )

गजानन कारभारी मुरकुट .. वादी

विरुध्द

राजेंद्र शिवाजी मुरकुट व इतर .. प्रतिवादी

## तात्पुरता मनाई हुकूम मिळण्याचा अर्ज नि.क्र.०५ वरील आदेश

१) प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ अनुसार दाखल करुन तहसीलदार सिंदखेडराजा यांनी रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/डोरव्ही/५०/२०२०–२१ मध्ये दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दिलेल्या निकालाच्या आधारे प्रतिवादींनी मौजे डोरव्ही, ता. सिंदखेडराजा येथील शेतजमीन गटक्रमांक १५५ मधील ३६ आर जमिनीतून नवीन रस्ता तयार करु नये, असा तात्पुरता मनाई आदेश या दाव्याचा निकाल होईपावेतो देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

२) प्रस्तुत अर्जास प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांचे लेखी म्हणणे नि.क्र.२७ अनुसार दाखल करुन अर्ज मंजूर करण्यास विरोध दर्शवला आहे. प्रतिवादी क्र. २, ४ ते ८ यांनी प्रस्तुत अर्जास त्यांचे लेखी म्हणणे दाखल केले नाही.

३) उभय पक्षांचे कथन व दाखल कागदपत्रांवरुन माझे विचारार्थ खालील मुद्दे उपस्थित झालेले असून, त्यांचे निष्कर्ष मी पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १) | वादीने प्रस्तुत अर्जासंदर्भात प्रथमदर्शनी पुरावा सादर केला आहे काय ? | ..नकारार्थी |
| २) | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे काय ? | ..नकारार्थी |
| ३) | अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे अपरिमीत नुकसान होणार आहे काय ? | ..नकारार्थी |
| ४) | कोणता आदेश ? | ..अर्ज नामंजूर करण्यात आला. |

## का र ण मि मां सा

४) वादीने प्रस्तुत अर्जातील कथनांच्या पृष्ठयर्थ स्वतःचे शपथपत्र दाखल करुन खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केलेले आहेत–

१ साक्षीदार देवराव यादवराव मुरकुट, विठोबा यादवराव मुरकुट, एकनाथ नारायण मुरकुट यांच्या शपथपत्राच्या प्रती,

२ नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५/२०२३ मधील साक्षीदार नितीन पांडूरंग जाधव– कोर्ट कमिशनर यांच्या साक्षी पुराव्याची प्रत,

३ नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५/२०२३ मध्ये कोर्ट कमिशनर यांनी दाखल केलेला अहवाल अप्रमाणित नकाशासह,

४ दिनांक ०८.०२.१९९४ व २३.०३.१९९८ रोजीच्या खरेदीखताच्या प्रती,

५ गटक्रमांक १५५ चा ७/१२ उतारा गाव नमुना–८ ची प्रत,

६ रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/डोरव्ही/५०/२०२०–२१ मधील प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी दिनांक १९.०७.२०२१ रोजी दिलेल्या अर्जाची प्रत, रोजनाम्याच्या प्रती, गजानन कारभारी मुरकुट, विठोबा यादवराव मुरकुट व एकनाथ नारायण मुरकुट यांच्या साक्षीपुराव्याची प्रती, दिनांक ०६.०६.२०२२ रोजी मामलतदार कोर्टाने दिलेल्या निकालाची प्रत, स्थळ पंचनामाची नकाशासह प्रत,

७ गटक्रमांक १५१,१५२, १५३, १५४,१५५,१५६, ८४,८६ या गटाच्या ७/१२ उता–याच्या प्रती,

५) प्रतिवादी क्र.१ व ३ यांनी त्यांच्या कथनाच्या पृष्ठयर्थ खालीलप्रमाणे कागदपत्र दाखल केले आहेत.

१ साक्षीदार कैलास प्रकाश खरात, सोहम शत्रुघ्न सोळंके यांचे शपथपत्र,
२ अप्रमाणित नकाशा
३ वादग्रस्त रस्त्याचे फोटो

६) वादी व प्रतिवादी यांच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ करीताः</u>**–

७) सर्व मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्यामुळे त्याची चर्चा एकत्रीत करण्यात येत आहे. उभयपक्षांच्या लेखी कथनावरुन असे दिसून येते की, मौजे डोरव्ही तालुका सिंदखेडराजा येथील गटक्रमांक १५५ मध्ये २६ आर जमीन वादीच्या नावे असून गट क्रमांक ८४, ८६ मध्ये प्रतिवादी क्र.१ ते ३ यांच्या नावे शेतजमिनी आहेत. वादीच्या कथनानुसार गटक्रमांक १५५ मधील वादीच्या जमिनीच्या धु–यावरुन तसेच गटक्रमांक १५१,१५२,१५३ व १५४ या जमिनीच्या धु–यावरुन प्रतिवादी क्र.१ व ३ यांना त्यांच्या जमिनीत जाणे येणे करिता कोणताही वहिवाटी रस्ता अस्तित्वात नव्हता व नाही. वरील वस्तुस्थिती असतांना प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी वादीच्या अपरोक्ष मामलतदार कोर्ट अॅक्टचे कलम ५ अनुसार खोटया मजकुराचा अर्ज दाखल करुन वर नमूद गटातील जमिनीतील धु–यावरुन असलेला रस्ता खुला होवून मिळण्याकरिता अर्ज दाखल केला होता. सदर वहिवाटी प्रकरणात वादीला पक्षकार करण्यात आले नव्हते. पुढे वादीचे कथन की, वादी हा वहिवाटी प्रकरणात आवश्यक पक्षकार असतांना त्याच्या अपरोक्ष मामलतदार कोर्टाने दिनांक ०६.०६.२०२२ रोजी आदेश पारित करुन गटक्रमांक १५५ मधील वादीच्या ३६ आर जमिनीतील धु–यावरुन तसेच गटक्रमांक

१५१, १५२ व १५४ मधील जमिनीचे पूर्वेकडील बाजूने असलेला उत्तरेकडून दक्षिणेकडे जाणारा रस्ता मंजूर केला आहे. वास्तविक पाहता मामलतदाराने पारित केलेला आदेश चुकीचा व बेकायदेशीर असून वादीवर बंधनकारक नाही.

८) पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, मामलतदार कोर्टाने रा.प्र. क्र.एम.सी.ए.–५/डोरव्ही/५०/२०२०–२१मध्ये दिनांक ०६.०६.२०२२ पारित केलेल्या आदेशास गटक्रमांक १५१,१५२,१५३ व १५४ मधील जमीन धारक दत्तात्रय उर्फ दत्तू श्रीराम मुरकुट, शिवराज दत्तू मुरकूट व श्रीमती यशोदा श्रीराम मुरकूट यांनी याच न्यायालयात नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५/२०२३ दाखल करुन आव्हान दिले आहे. वर नमूद नियमित दिवाणी दावा क्रमांक ६५/२०२३ मधील वादी म्हणजेच दत्तात्रय उर्फ दत्तू मुरकूट व इतर यांनी मामलतदार कोर्टाने पारित केलेल्या आदेशास स्थगिती मिळण्याकरिता तसा अर्ज नि.क्र. ०५ अन्वये दाखल केला होता. सदरचा अर्ज नि.क्र. ०५ चौकशी अंती दिनांक ०८.०९.२०२३ रोजी नामंजूर करण्यात आला आहे.

९) प्रस्तुत संचिकेत दाखल कागदपत्रावरुन न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, प्रतिवादी क्र.१ ते ३ यांनी मामलतदार कोर्ट अॅक्टचे कलम ५ अनुसार दाखल केलेल्या वहिवाटी प्रकरणात वादी यास पक्षकार करण्यात आले नव्हते. मामलतदार कोर्टाने दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दिलेल्या आदेशात इतर गटासह गटक्रमांक १५५ मधील वादीच्या जमिनीतील धु–यावरुन रस्ता मंजूर केल्याचे दिसून येत आहे. वादीच्या कथनानुसार वर नमुद वहिवाटी प्रकरणात तो पक्षकार नसल्यामुळे मामलतदार कोर्टाने दिनांक ०६.०६.२०२२ रोजी दिलेला आदेश त्याच्यावर बंधनकारक नाही. पुढे न्यायालयाच्या असे निदर्शनास येते की, दत्तू श्रीराम मुरकुट व

इतर यांच्या बाजूने वादीने वहिवाटी प्रकरणात स्वतःची साक्ष नोंदविलेली आहे. त्यामुळे वादीस वर नमूद वहिवाटी प्रकरणाची माहिती नव्हती किंवा त्याच्या अपरोक्ष मामलतदार कोर्टाने वरीलप्रमाणे आदेश पारित केला आहे असा निष्कर्ष काढता येणार नाही.

१०) प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना त्यांच्या जमिनीत जाणे येणे करिता कोणता वहिवाटी रस्ता उपलब्ध आहे, याचा उल्लेख वादीने प्रस्तुत अर्जात किंवा वादपत्रात केलेला नाही. याउलट, रा.प्र.क्र.एम.सी.ए.–५/डोरव्ही/५०/२०२०–२१ मध्ये दाखल केलेल्या साक्षीपुरावा, स्थळ पंचनामा, लेखी जबाब, अंतिम लेखी युक्तीवाद तसेच उपविभागीय अधिकारी सिंदखेडराजा यांच्या न्यायालयात दाखल केलेल्या रिव्हीजन / अपील व लेखी युक्तीवादामध्ये "अर्जदार राजेंद्र शिवाजी मुरकुट व इतर यांना त्यांची जमीन गटक्रमांक ८४ व ८६ मध्ये जाणे येणे करिता मौजे डोरव्ही ते मलकापूर पांग्रा या डांबरी रस्त्याने येवून भगवानराव बापुराव मुरकुट यांच्या गटक्रमांक १५६ च्या पश्चिम धु–याने उत्तर–दक्षिण चालीचा बैलगाडी रस्ता उपलब्ध होता व आहे आणि सदर रस्त्याचा ते वापर करीत आहेत. " असा उल्लेख केलेला आहे. एकंदरीत असे दिसून येते की, वादीच्या जमिनीच्या पूर्व बाजूने उत्तर–दक्षिण चालीचा वहिवाटी रस्ता प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना उपलब्ध आहे. मामलतदार कोर्टाने केलेल्या स्थळ निरीक्षण अहवालावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, वादी व गटक्रमांक १५१, १५२, १५३ व १५४ च्या जमीन धारकांनी त्यांच्या जमिनीच्या पूर्व बाजूस काटया लावून प्रतिवादींची वहिवाट बंद केलेली होती.

११) मामलतदार कोर्टाने दिलेला निकाल, उभयपक्षांचे लेखी कथन, स्थळ निरीक्षण अहवालाच्या आधारे दिलेला असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. सदर

निकालास स्थगिती देण्याचे कोणतेही संयुक्तीक कारण न्यायालयास दिसून येत नाही. प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना वाद रस्त्या व्यतिरिक्त इतर पर्यायी वहिवाटी रस्ता उपलब्ध असल्याबाबत वादीने कोणताही कागदोपत्री पुरावा सादर केला नाही. याउलट, गटक्रमांक १५५ मधील वादीच्या जमिनीच्या पूर्व बाजूने उत्तर–दक्षिण चालीचा प्रतिवादी क्र.१ ते ३ यांचा वहिवाटी रस्ता असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तुत अर्ज मंजूर होणे संदर्भात वादी पक्षाने कोणताही सकृतदर्शनी पुरावा न्यायालयात सादर केलेला नाही. न्यायालयात दाखल कागदपत्रावरुन न्यायाचा समतोल प्रतिवादी यांच्या बाजूने असल्याचे स्पष्ट होत आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज वादींच्या मागणीनुसार मंजूर होण्यास पात्र नाही. त्या अनुषंगाने मी मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.४ करीताचे निष्कर्षार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. प्रस्तुतचा अर्ज नि.क्र.०५ नामंजूर करण्यात आला.
२. खर्चाबाबत हुकूम नाही.
३. उभयपक्षातील वाद वहिवाटी रस्त्या संदर्भात असल्यामुळे दावा आजपासून चार महिन्याच्या आत निकाली काढणेकामी उभयपक्षांनी आपापला पुरावा नेमलेल्या तारखेस सादर करावा.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by ABDUL KARIM ABDUL RAHIMAN SHAIKH
Date: 2024.10.23 11:36:27 +0530

(अ.अ.शेख)
दिनांक:–२२/१०/२०२४. दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
मेहकर.

I A.N.Vyawhare, Stenographer (Grade II ) affirm that, contents of the PDF files are same words for words as per original.

Date of Judgment / order : 22.10.2024
Date of Uploading : 23.10.2024